# *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक - १३४८/२०१८/नाशिक**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. राहुल बाळासाहेब कडभाने,<br>मु.पो.डुबेरे,<br>ता.सिन्नर, जि.नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा,<br>मुख्याध्यापक,<br>जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा,<br>डुबेरे, ता.सिन्नर, जि.नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>गट शिक्षणाधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, सिन्नर,<br>ता.सिन्नर, जि.नाशिक. | : | प्रतिवादी |

**ऑनलाईन सुनावणी दिनांक - १७/०२/२०२१**

अपिलार्थी यांनी दिनांक २३/०५/२०१८ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये दिनांक १७/०२/२०२१ रोजी meet.google.com/fvi-asdd-eip या गुगल मिट कोडद्वारे आयोजित ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १३/०३/२०१८ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल व विसंगत माहिती पुरविली. त्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील दाखल करावे लागले.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक १३/०३/२०१८ रोजीच्या माहिती अर्जान्वये सन २०११ ते २०१७ या कालावधीतील लोकचेतना प्रशिक्षण कार्यक्रमाची सविस्तर खर्चासह माहिती, मंजूर निधी व खर्चाचा संबंधिची शासकीय माहिती व खर्च पत्रक बिले, उपस्थिती भत्ते झालेला खर्चासह तसेच शाळेने घेतलेले इतर सर्व कार्यक्रमांची रुपरेषेसह माहिती मागितली होती. त्यास अनुसरुन अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी दिनांक १६/०४/२०१८ अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीदरम्यान विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक १६/०४/२०१८ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३/०५/२०१८ रोजी निर्णय पारीत करुन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती २० दिवसांचे आत पुरविण्याबाबतचे निर्देश तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना देऊन प्रथम अपील निकाली काढले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक १३/०३/२०१८ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयानंतरही माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसून येत नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच अपिलार्थी यांना माहिती अप्राप्त असल्याने आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डुबेरे, श्री. मधुकर शिंदे यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १३/०३/२०१८ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डुबेरे, श्री. राजु गंगाराम गोफणे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १३/०३/२०१८ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन विहित मुदतीत तसेच प्रथम अपील निर्णयानंतरही माहिती पुरविली नाही. तसेच माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर दुर्लक्ष व टाळाटाळ केल्याचे दिसुन येते. त्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगासमोर **दिनांक २०/०४/२०२१ रोजी** सादर करावा. अन्यथा,

त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३) वरील निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक १३४८/२०१८/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(के.एल.बिश्नोई)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

श्री. राजु गंगाराम गोफणे (तत्कालीन जन माहिती अधिकारी) मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डुबेरे, ता.सिन्नर, जि.नाशिक.

---

प्रत,

गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, सिन्नर, ता.सिन्नर, जि.नाशिक.
यांना उपरोक्त आदेशानुसार संबंधित अधिकारी यांचेकडून खुलासा आयोगास सादर करण्याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्याकरिता उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.